# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक २७ डिसेंबर २०२०

[**वेळ** : सकाळी १०-३० ते दुपारी १-००]

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— **१०**

जंगलात फिरण्यासाठी मला एक हत्तीण मिळाली होती. तिचे नाव वैजयंती असे होते. मोठी देखणी, इंद्राच्या ऐरावताची मुलगी शोभेल अशी होती ती आणि चालत पण होती अशी ऐटीत, की गवतातून चालताना जणू रेशमी साडी सळसळते आहे असे वाटावे. निघाल्यापासून थोड्याच वेळात ती एका जराशा उघड्या ठिकाणी आली आणि माहुताने खूण केल्याबरोबर उभी राहिली. समोरच आमच्याजवळ एक गेंडा अगदी निश्चल उभा होता. चिलखत घालून पहाऱ्यावर उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योद्ध्यासारखा. जराशी मान हलवून त्याने आमच्याकडे पाहिले व मनात नक्की केले की, आपली जागा सोडून पुढे-मागे होण्याची जरुरी नाही. त्याचा फोटो घेण्याची माझी मनीषा जाणून माहुताने हत्तिणीला चुचकारत चुचकारत उभी केली. मी गेंड्याचे मनसोक्त फोटो घेतले.

त्या माहुताकडून दोन गोष्टींची माहिती मिळाली. बाजारात गेंड्याच्या नाकावरील शिंगाची किंमत जवळजवळ दोन हजार रुपये इतकी असते ही एक व दुसरी अशी की, शरीर थंड राखण्यासाठी चिखलाने अंग माखून घेणारा गेंडा हा सामाजिक आरोग्याचा भोक्ता असतो. सबंध मोठ्या जंगलात फक्त एकाच ठिकाणी जाऊन तो आपली विष्ठा टाकतो. कित्येक मैल दूर असला तरी त्याच एका जागेवर तो नेहमी परतून येतो. घाण वाटेल तेथे टाकू नये, शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्रास होईल असे वागू नये हे समजणारा गेंडा निःसंशय शहाणाच म्हटला पाहिजे.

[उलटून पहा

माहुताने खूण केली व गर्रकन वळसा घेऊन वैजयंती दुसरीकडे निघाली. त्याचवेळी एक पांढराशुभ्र गायबगळा डोक्यावरून पंख हालवत उडाला. मी लगेच मनात नक्की केले की, जवळपास कुठेतरी रानम्हशींचा कळप असला पाहिजे. माझा तर्क खरा ठरला. गिरकी घेऊन बगळा जिथे उतरला, त्यादिशेने माहुताने वैजयंतीला हाकारले आणि पाच-पंधरा म्हशींचा एक कळप शांतपणे चरताना आमच्या दृष्टीस पडला. म्हशी गवतातून चालतात, त्यावेळी गवतातले अनेक लहान कीटक घाबरून हवेत उडतात. त्यांना खाण्यासाठी बगळे नेहमीच म्हशींच्याजवळ अथवा त्यांच्या पाठीवरही येऊन बसतात. विशाल शिंगांच्या दहा-पंधरा म्हशींच्यामधून वावरणारे बगळे पाहून मनात आले, की निसर्गाची ही काळ्यावरची पांढरी लिपी केव्हातरी कागदावर चित्रित केली पाहिजे. आसामी जंगलातल्या या रानम्हशींची शिंगे दिसायला मोठी सुंदर आणि विशाल अर्धचंद्राकृती असतात.

हत्तीपेक्षाही उंच असलेल्या 'एलिफंट ग्रास' (हत्ती गवत) मधून चिखल तुडवत माहुताने वैजयंतीला पुढे काढली. थोडे अंतर चालून गेल्यावर मध्येच थांबून तिने सोंड वर केली आणि तुतारीसारखी दीर्घ किंकाळी फोडली. मला वाटले काहीतरी संकट आहे. माहुताने इकडे तिकडे नजर फिरवली आणि हत्तिणीला पुढे चालण्याची सूचना केली. सावधपणे पावले टाकत, गवतातून चालत ती एका डबक्यापाशी आली. डबक्याच्या काठावर एक हरीण मरून पडले होते. हत्तिणीने पुन्हा एक किंकाळी फोडली आणि तोंड हवेत फिरवून चारी दिशांचा वास घेतला जणू काय मृत्यूची पावले आजुबाजुला कुठे रेंगाळत आहेत की काय, याचा मागोवा ती घेत होती. माहुताने वैजयंतीला जरा खाली वाकायला लावले आणि आपल्या सोबत्याला खाली उडी मारायला सांगितले. त्या सोबत्याने खाली उतरून हरणाच्या प्रेताचे नीट निरीक्षण केले. कुठल्या तरी प्राण्याने छातीत शिंग खुपसून त्याची हत्या केली होती. किती नाजूक, सुंदर जीव ; पण जनावराच्या एका आंधळ्या, वेड्या लहरीबरोबर चक्काचूर झाला त्याचा ! माझे मन क्षणभर बधीर झाले.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) लेखकाला जंगलात फिरण्यासाठी मिळालेल्या हत्तिणीची माहिती लिहा.

(ब) माहुताकडून लेखकाला गेंड्याबद्दलची कोणती माहिती मिळाली ?

(क) लेखकाने आसामी जंगलातील रानम्हशींचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ड) बगळे नेहमीच म्हशींच्याजवळ का वावरतात ?

(इ) 'एलिफंट ग्रास' मधील कोणते दृश्य पाहून लेखकाचे मन बधीर झाले ?

गुण

२. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचे अर्थ लिहून त्यांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा :— १०

(१) आस लागणे

(२) खेद वाटणे

(३) जिवाचे कान करून ऐकणे

(४) इनाम देणे

(५) हिरमोड होणे

(६) मायेची पाखर घालणे.

(ब) गट 'एक' मधील शब्दांची गट 'दोन' मधील समानार्थी शब्दांबरोबर जुळणी करा :— १०

| गट '**एक**' | गट '**दोन**' |
|---|---|
| (१) सूर्य | (अ) रत्नाकर |
| (२) आई | (ब) तरू |
| (३) आकाश | (क) पवन |
| (४) नदी | (ड) लोचन |
| (५) राजा | (इ) जननी |
| (६) पाणी | (फ) सरिता |
| (७) झाड | (ग) दिनकर |
| (८) डोळे | (ह) गगन |
| (९) समुद्र | (य) नरेश |
| (१०) वारा | (र) उदक. |

३. पाठ्यपुस्तकातील पाठांच्या आधारे पुढीलपैकी **पाच** प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा :— २०

(अ) शिरीषमधील तुम्हाला समजलेली गुणवैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

(ब) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.

(क) तुम्हाला समजलेल्या 'सखू आजीचे' व्यक्तिचित्र रेखाटा.

(ड) 'व्यंगचित्र हे व्यक्तीचे गुण-दोष मांडण्याचे प्रभावी अस्त्र आहे' हा विचार सोदाहरण स्पष्ट करा.

(इ) बंडूनानांच्या कुलुपांच्या शौकामुळे घडलेले चमत्कारिक प्रसंग लिहा.

(फ) पक्षी निरीक्षणातून पक्ष्यांच्या जीवनपद्धतीसंबंधी माहिती लिहा.

४. 'जी.आय.पी. रेल्वे' पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :— १०

(अ) 'मुंबई-ठाणे' पहिल्या आगगाडीच्या मुहूर्ताचे वर्णन करा.

(ब) आगगाडीच्या संदर्भात लोकांच्या मनात कोणती अंधश्रद्धा होती ?

(क) रेल्वेचा प्रवास धोक्याचा नाही हे पटविण्यासाठी रेल्वेच्या कारभाऱ्यांनी का आटापीटा केला ?

(ड) इंग्रजांनी देऊ केलेली मुंबई-ठाणे रेल्वे प्रवासाची इनामे बंद का करण्यात आली ?

(इ) सुरुवातीच्या मुंबई-पुणे रेल्वे प्रवासाचे वर्णन लेखकाने कोणत्या शब्दांत केले आहे ?

[ उलटून पहा

गुण

**किंवा**

'माझे शिक्षक व संस्कार' पाठाच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) कात्रेमास्तरांचे वर्णन लेखकाने कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ब) श्री. गोळीवडेकर मास्तर विद्यार्थ्यांवर का प्रेम करीत असत ?

(क) लेखक शंकर खरात यांनी हेडमास्तरांचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ड) लेखकाने कुस्तीच्या फडाबद्दलची कोणती आठवण सांगितली आहे ?

(इ) रायगावकर सरांनी लेखकाला केलेला कोणता उपदेश लेखक विसरू शकत नव्हते ?

५. 'भेटीलागी जीवा' व 'तिफन' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :—

(अ) संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेले दृष्टांत सांगा. ५

(ब) 'काटा पायात रूतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते' या ओळीतील भावार्थ स्पष्ट करा. ५

**किंवा**

'व्यायामाचे महत्त्व' व 'उजाड उघडे माळरानही' या कवितांच्या आधारे पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :—

(अ) व्यायामाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगा. ५

(ब) 'उजाड उघडे माळरानही गाऊ लागले वसंतगान' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा. ५

६. (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय लिहा :— ५

(१) Corporation

(२) Magazine

(३) Plumber

(४) Category

(५) Humanism

(६) Junior Clerk.

(ब) पुढील इंग्रजी प्रश्नांची उत्तरे मराठीत पूर्ण वाक्यात लिहा :— ५

(१) Who is your Role Model ?

(२) What is your hobby ?

(३) Who is your favourite player in football ?

(४) Which is your favourite festival ?

(५) What do you do in your freetime ?

(६) Which is our National animal ?

(क) पुढील अंक अक्षरात लिहा :— ५

(१) २८ + १५ = ४३

(२) १९ – ०७ = १२

(३) ३० ÷ ०६ = ०५

(४) १५ × ०५ = ७५

(५) ५७%.

(ड) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचा अर्थपूर्ण वाक्यात उपयोग करा :— ५

(१) आकाश

(२) नदी

(३) जंगल

(४) शेतकरी

(५) शाळा

(६) बाग.

७. (अ) पुढील शब्दांचे लिंग बदला :— ३

(१) शिक्षक

(२) मामी

(३) पती.

(ब) पुढील शब्दांचे वचन बदला :— ३

(१) पुस्तक

(२) महिना

(३) गाडी.

(क) पुढील वाक्यांत कंसात दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही **चार** ) :— ४

(१) म्हणून त्यांनी तिजोरी उजेडात आणून (ठेवणे).

(२) दोनशे प्रवासी पोटात घेऊन आमची नाव जोरात (निघणे).

(३) शिरीषने भूप रागातली गत् वाजवायला सुरुवात (करणे).

(४) मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत (येणे).

(५) एक पांढराशुभ्र गायबगळा डोक्यावरून पंख हालवत (उडणे).

---

CON 754

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक २७ डिसेंबर २०२०

[**वेळ :** दुपारी १-४५ ते सायंकाळी ४-३०]

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा पूर्ण **गुण** दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २० ओळींचा निबंध लिहा :— **२०**

(अ) वाढती बेरोजगारी : एक समस्या

(ब) जलप्रदूषणाचे दुष्परिणाम.

२. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयाच्या संदर्भात सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार लिहा :— **२०**

(अ) मुलगी शिकली, प्रगती झाली.

(ब) महाराष्ट्रातील शेती व्यवसायातील समस्या.

३. खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— **३०**

(अ) कोरोना महामारीच्या काळात घरमालक भाडेकरूंना भाडे वेळेवर न दिल्याने घरातून निष्कासित करू नये यासाठी शासनामार्फत घरभाडे सवलतीचा आदेश वजा सूचनापत्र तयार करा.

(ब) राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतचे परिपत्रक तयार करा.

(क) अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करा.

[उलटून पहा

गुण

४. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दहा** शब्दांचे मराठीत अर्थ लिहा :—' १०

(१) Illiterate

(२) Self Dependent

(३) Free from Fault

(४) Selfless

(५) Confidential Report

(६) Neighbour

(७) Compensation

(८) Without Water

(९) Ridiculous

(१०) Inauguration

(११) Educational Inspector.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा:— १०

(१) I like to go to Mumbai, but I have no money.

(२) The Superintendent has examined the draft.

(३) The factory owner has brought the machines.

(४) The teacher tells stories and we listen to them.

(५) The staff has come late today.

(६) Farmers generally work in the fields all the year round.

५. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— १०

My first vision for India is FREEDOM. I believe that India had its first vision of freedom in 1857, when we started the war of Independence. It is this freedom that we must protect and nurture and build on. If we are not free, no one will respect us.

My second vision for India is Development. For 50 years, we have been a developing nation. It is time to see ourselves as a developed nation. We are among the top five nations of the world in terms of Gross Domestic Product (GDP) ; We have 10 percent growth rate in most areas.